# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. 0253-2232764 ई-मेल - sicnashik@gmail.com


| तक्रार क्रमांक-५३६/२०२५/अहिल्यानगर | | |
|---|---|---|
| द्वितीय अपील क्र.- ७६०/२०२२/अहिल्यानगर | | |
| अ.क्र. | तपशील | |
| १. | श्री. दत्तात्रय रघुनाथ मरकड,रा.कमलकुंज बिल्डींग, प्लॉट नं.१०१, दिनकर पठारे वस्ती, सोमेश्वर मंदिराजवळ, चंदननगर, पुणे, ता.हवेली, जि.पुणे ४११०१४ | तक्रारदार |
| | विरूद्ध | |
| १. | पोलिस निरीक्षक, कोतवाली पोलिस स्टेशन, अहिल्यानगर, माणिक चौक, अहिल्यानगर, ता.जि.अहिल्यानगर | उत्तरवादी क्र.१ |
| २. | उपविभागीय पोलिस अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी यांचे कार्यालय, अहिल्यानगर,ता.जि.अहिल्यानगर | उत्तरवादी क्र.२ |

(निर्णय दिनांक०१/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक ०८/१०/२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ७६०/२०२२/अहिल्यानगर संदर्भात दिनांक ११/०२/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १४/०७/२०२५ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, कोतवाली पोलिस स्टेशन, अहिल्यानगर यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की,आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ७६०/२०२२/अहिल्यानगर संदर्भात दिनांक ११/०२/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १४/०७/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, कोतवाली पोलिस स्टेशन, अहिल्यानगर यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ७६०/२०२२/अहिल्यानगर संदर्भात दिनांक १४/०७/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. पोलिस अधीक्षक, पोलिस अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर,ता.जि. अहिल्यानगर यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. ५३६/२०२५/**अहिल्यानगर** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्र शा इ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

तक्रार क्रमांक-५३६/२०२५/अहिल्यानगर /जावक क्र.८४२३ दिनांक-०६/०८/२०२५

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. पोलिस अधीक्षक, पोलिस अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर,ता.जि. अहिल्यानगर

२ .निवडनस्ती